



**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

**विषय- आदिवासी लोकगीते**

**शीर्षक: रेला पाटा (भीडी) एक शास्वत जिवनाचे सार**

**सादर कर्ता: ओमकार आनंदराव आत्राम (pursuing B.Pharm. at SHDIP, Kuhi, Nagpur)**

## गोषवारा/Abstract

आज जगामध्ये थोड का होईना शाश्वत जीवनाचं याड आजच्या या युवा पिढीला लागत चाललेला आहे, शाश्वत जीवनाचं गूढ रहस्य हे आदिवासी संस्कृतिचा मूळ पाया आहे. रेला पाटा (भीडी) म्हणजे नेमक काय? त्याच्यात असलेला निसर्गातील रहस्याचा खजिना, या निसर्गात राहून त्याच्याशी एकरूप होऊन कसे जगावे याचा सार या रेला पाटा (भीडी) मद्ये आहे. या निसर्गातील अश्या काही गूढ रहस्यांचा सार या रेला पाटा मद्ये आहे. या गूढ रहस्यान वरती शोध झालं पाहिजे, ते निसर्गातील गुंतागुंतीचे कोडे उलगडले पाहिजे या निसर्गाची गोडी येणाऱ्या युवापिढीला चाखता आली पाहिजे.

प्रसिध्द लेखक/ वनसहित्यिक कांबरिकार मारोती चितमपल्ली यांनी आदिवासी हा निसर्गाचाच एक भाग आहे असं म्हटल आहे. त्यांनी मराठी शब्दकोश्याला तब्बल 2000 आदिवासींच्या बोलीभाषेतील शब्द दिले आहेत. त्यांनी आदिववासिंसोबत राहून या निसर्गातील खूप रहस्ये उलगडवून ठेवले आहेत. या निसर्गातील रहस्ये या जगापुढे आले पाहिजे. याच्यासाठी प्रचलित रेला पाटा यांच्यातील सार एका सामान्य भाषेत लिहून, त्याच्याती ज्ञान येणाऱ्या युवापिढिपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न मी याच्यात केलेला आहे. सहसा आदिवासी लोकं स्वतःचा ज्ञान दुसऱ्यांना देण्यास झिझकतात, परंतु मी स्वतः गोंड आदिवासी समुदायाशी संबंधित असल्यामुळे मला ते जन्मजात प्राप्त झाले.

जसे बहिणाबाई चौधरी यांच्या ओव्यांमधे जीवणाचे सार आहेत तसेच शास्वत जीवनाचे सार आणि जंगलाचे रहस्य या लोकगीतांमध्ये आहेत. निसर्ग, नैसर्गीक शेती पद्धती, नैसर्गिक घरबांधणी पद्धती आणि जडीबुटी यांचा ज्ञान हा पूर्वजांनी रेला पाटा या लोकगीतांमध्दे परावर्तित करून कित्तेक वर्षे तो ज्ञान रेला पाटांमध्दे पूर्वजांनी सुरक्षित ठेवलेला आहे. परंतू तो असलेला ज्ञान हा स्थानिक भाषा आणि आदिवासी बोलीभाषा यांच्यामधे असल्यामुळे इतरांना ते अलगद समजून येवू शकत नाही, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मानवाचा निसर्गाशी असलेला नातं तुटलेला आहे आज आपण निसर्गापासून वेगळे झालो आहोत काळाची गरज आहे माणसाला आणि एकरूप करण्याची नाहीतर येत्या काही वर्षांतच हा जग संपुष्टात येईल याच्यासाठी आपल्याला पूर्वज ठेवलेला ज्ञानाचा भंडार एकदा समजून घ्यायला हवे तसेच शास्वत जीवनाचा अर्थ येत्या युवापिढीला समत्याच्यासाठी काही पुरावे आणि साक्षांचा संग्रह आणि साठा केलेला आहो.

**मुख्य शब्द**: रेला, पाटा, शाश्वत जीवन, गोंड ,शेती , निसर्ग, भाषा.

## परिचय

रेला पाटा हे एक मुख्यतः गोंड आदिवासिंमध्ये गायले जाणारे लोकगीत आहेत . प्रामुख्याने रेला पाटा (रेला गीत ) खूप वेगवेगळ्या प्रकारचे असतात उदा. मडमिंग रेला पाटा ( लगीन रेला गीत ) , येंदाना रेला पाटा (नाच रेला गीत) आणि कर्सणा रेला पाटा (खेल रेला गीत )असे अनेक प्रकार असतात. रेला पाटा मुख्यतः समुहाने गायले जाणारे लोकगीत आहे, आदिवासी समुदायामद्ये महीला तसेच पुरुष दोघेही ही लोकगीत मोठ्या उत्साहाने गातात.रेला पाटा हे लोकगीत गात असताना मुख्यतः गीताची सुरूवात ही "रेला रे रेला रेला "अश्या लयाने केली जाते.रेला पाटा या लोकगीतांमध्ये प्रामुख्याने आपल्या पूर्वजांचे कार्य, त्यांनी जगलेले आयुष्य , शिकारीचे किस्से, निसर्गातील प्राण्यांचे किस्से, शेतीचे किस्से तसेच रोजच्या जीवनातील किस्से त्या लोकगीतांमधे गायल्या जातात. रेला पाटा ही लोकगीतं प्रामुख्याने गोंडी या भाषेमध्ये आढळतात परंतू अलीकडच्या काळात गडचिरोली आणि चंद्रपूर (चांदा) या प्रदेशात झालेल्या मराठीच्या प्रभावामुळे गोंडी आणि मराठी मिश्र झाडीबोली मध्ये सुध्दा आढळतात.

## शाश्वत जीवन

### रेला पाटा एक लोकगीत त्याचे महत्व

"शाश्वत जीवन" म्हणजे आपल्या जीवनशैलीच्या निवडींचा आपल्या सभोवतालच्या जगावर कसा परिणाम होतो हे समजून घेणे आणि प्रत्येकासाठी चांगले आणि हलके जगण्याचे मार्ग शोधणे. शाश्वत जीवनामध्ये पैशाला काहीही महत्व नसतो. शाश्वत जीवनशैली म्हणजे एक प्रकारची प्रकृती सोबत ताळमेळ जोडून आयुष्य जगणे म्हणजेच शाश्वत जीवनशैली होय. हा निसर्ग ही प्रकृती माणसाला आवश्यक अश्या सगळ्याच गोष्टींची पुरवठा करते. माणसाच्या अन्नसाखळीत होत असलेला बदल हा निसर्गाला येणाऱ्या काळात हानिकारक ठरणार आहे. वाढत चाललेली कॉंक्रीटची जंगले आणि कमी होत चाललेली झाडांची जंगले,येत्या काळात माणसाला खूप अडचणीचे ठरणार आहे.

अगदी वेळात स्वतःला सावरून माणूस प्रकृतीची होत असलेली हानी थांबवली पाहिजे. शाश्वत जीवनामध्ये पैशाला काही महत्त्व नसतो,परंतु आत्ताच्या आयुष्यात पैशाला खूप महत्त्व वाढले आहे. वाढत्या पैशाच्या महत्त्वामुळे आताच्या युवा पिढीला असे वाटू लागले आहे की आयुष्याची किंमत ही कवळीमोल आहे. शाश्वत जीवनशैली म्हणजे नेमकं काय? तर आपण सरळ साध्या सोप्या पद्धतीने आदिवासींच्या जीवनशैलीचा एक प्रतिरूप मानू शकतो. ती जीवनशैली आपलीसी करून आजच्या युगातील तरुण तरुणींनी एक सरळ साध्या सोप्या पद्धतीने आपले आयुष्य जगू शकतात, ते सुद्धा निसर्गाला हानी न पोहोचवता. प्रसिद्ध वनसाहित्तिक, लेखक, कादंबरीकार अरण्य ऋषी मारुती चितमपल्ली म्हणतात की, आदिवासी हा निसर्गातीलच एक भाग आहे, तो निसर्गापासून वेगळा नाही. आदिवासी हा जर निसर्गाचाच भाग असेल तर, त्याची जीवनशैली सुद्धा निसर्गाला पूरक अशीच आहे. आदिवासींच्या जीवनशैली ढवळाढवळ करण्याची इतरांना गरज नाही. आदिवासी हा हजारो वर्षापासून या इथे वावरत येत असल्यामुळे तो इथल्या निसर्गाशी पूरक असा घटक आहे, त्याला सभ्य समाजाशी जोडून त्याच्यात विकास करण्याची गरज नाही. आदिवासी जिथे राहतो तिथे तो त्या ठिकाणी सुखी समाधानी आणि गर्वाने आहे. आदिवासींचे जीवनशैली ही शाश्वत जीवनशैलीचे मूळ स्वरूप आहे.

## रेला पाटा मधील काही शाश्वत जीवनाचे सार.

### शेती/शेती पद्धती

माणसाच्या उत्क्रांती मद्ये माणूस जेव्हां गुहेत समूहाने राहू लागला तेव्हा शेतीची सुरुवात झाली . रेला पाटा मद्ये उल्लेख मिळतो की नांगराच्या वापराच्या पहिले कोहकी *(*खुरपा*)* आणि हेटेळ *(* विळा *)* यांच्या उपयोगाने शेती होत होती. ती अवजारे आत्ताही गोंड आदिवासी वापरतात. शेती ही विशिष्ट प्रदेशानुसार हवामानानुसार बदलतो याचा उल्लेख सुध्दा वेगवेगळया प्रदेशातील रेला पाटां मध्ये मिळतो. कोणत्या बियांची पेरणी कधी करावी याचा उल्लेख आढळून आले.

रेला पाटा*: "झिमिड झिमिड पिर वांता, नावा भाटो भाडी उसांता फोरो फेंडा किसी"*

मराठी अर्थ*: "झिमीड झिमीड पाउसामध्ये आमचा भाटो वाल( घेवडा) लावत आहे"*

तर्कशिलपणे या ओडीचा अर्थ काढला तर असे निदर्शनास आले की , वाल हे वेलवर्गीय पीक आहे , त्याच्या चांगल्या उत्पन्नासाठी त्याची लागवड ही पावसात करावी , तेव्हाच ते पिक चांगले उत्पन्न देते. तसेच वेलवर्गीय पीक भात पिकाच्या बांधावरती लावण्याचं दुसर एक कारण म्हणजे वेलवर्गीय पिकासाठी आधार म्हणून बांबूच्या काठ्या *(*फलर/फरल*)* लावल्या जातात. त्या काठ्यांचा दुसरा उपयोग म्हणजे रात्री भातशेतीचे नासाडी करणाऱ्या उंदरांच योग्य व्यवस्थापन होते , ते कसे तर *?* तर ते असे की त्या लावलेल्या काठ्या पक्षीथांब्याचे काम करतो . रात्रीच्या वेळेस घुबडासाराखे निशाचर पक्षी तिथे येऊन बसतात आणि शेतातील उंदारांच व्यवस्थापन करतात.

*3 " उर्समा ,उर्समा रो संगी मरका मरा इविरे उर्समा , बारी बारी हा संगो नाक जरा वेहा"*

मराठी अर्थ*: (* लावू नको , लावू नको संगी आंब्याच झाड एकट लावू नको, का बर हा संगो मला थोड सांग, *)*

या रेला गीतातील ओळींचा अर्थ असे निदर्शनास आले की, गोंड आदिवासी जिथे राहतात तो प्रदेश उष्णकटिबंधीय असल्यामुळे ,खूप कडाकून उनाचा तडका या प्रदेशात असतो . या उनाच्या तडाक्यात एकटी लावलेली छोटी छोटी आंब्याची रोपटे मरतात म्हणुन ती एकटी न लावता त्याच्या सोबतीला त्याची "पत्नी" म्हणजेच पळसाला लावावे , उन्हाळ्यात पळसाची पाने मोठी असल्यामुळे त्या आंब्याच्या रोपाचे रक्षण गाईढोरांपासुन आणि वरील उष्णतेपासून होत असते .पावसाळ्याच्या सुरवातीला गोंड आदिवासी ती मोठी झालेली पळसाची पाने तोडतात , त्या आंब्याच्या वाढीसाठी . म्हणुन कित्तेक ओसाड अश्या पळीत जमिनिवराती*7* आदिवासींनी आंब्याचे बन *(* मरका वाडी*)* तयार केले होते . गोंड आदिवासी आंब्याच्या झाडाच्या खोड तसेच फळ दोनही उपयोगात आणतात. आंब्याची झाडं गोंड आदिवासी मुख्यतः त्यांच्या कित्तेक पिढ्या चालत आलेल्या *(*मरका मरा ढोल*)* ढोलाच्या लाकडासाठी लावतात.

**खाद्यसंस्कृती**

खाद्यसंस्कृती विचारात घेता, गोंड आदिवासी खूप अश्या खाद्यपदार्थांची बनवण्याची प्रक्रिया तसेच कोणते पदार्थ कधी कोणत्या वेळेत खावावेत याची सुध्दा माहिती रेला गीतांमध्ये सुरक्षित सांभाळून ठेवली गेलेली आहे. काही कंद ही विशिष्ट ऋतूतच खवावी अन्यथा विषबाधा पण हो शकतो याचा उल्लेख पण उपरोक्त रेला गीतांमध्ये केला गेलेला आहे . आजच्या घडीला गोंड आदिवासिंच्या खाद्यसंस्कृतीत खूप मोठे बदल झालेले दिसतो .जसे एक ओळी आहे की,

रेला पाटा*: "फोरो पाटाळ धन्नेगावाते बत्तीस तीर्कना वांजिंग बा, आदे वंजींग बोना रा , अदे वंजिंग बोना? आद वंजिंग लींगाना बा, आदे वंजिंग लिंगाना .आदे वंजिंग तिनले कटो नरमनक्याल बा.बारी तीनले कटो आदे जरा वेहा रो? आदे वंजिंग नालुंग पेंकना तींदानलासी मताट रा ."*

मराठी अर्थ *: (* फोरो पाटाळ धन्नेगावामध्ये *(* कचारगड धन्नेगाव *)32* प्रकारचे धान आहेत ,ते धान कोनाचे *?* ते धान लिंगोचे आहेत,ते धान माणसांसाठी खायला जमत नाही ,का बर *?*ते धान चार सगांसाठी आहेत.

उल्लेखित ओळींचा तर्कशिल अभ्यास करता असे लक्षात येते की जरीही आदिवासी भातशेती मोठया प्रमाणात करत असले तरीही त्यांचा तो प्रमुख आहार नाही आहे. प्रामुख्याने भात पिकवत होते तरीही फक्त सणासुदीला आणि एखाद्या कार्यक्रमाच्या प्रसंगीच आदिवासीं घरात भात शिजायच,आणि अश्या सामान्य दिवशी ज्वारीच्या कन्या, भाकऱ्या तसेच मक्याच्या कन्या खात

असत.सध्याच्या काळात भातशेतीचे उत्पन्न खूप वाढल्यामुळे आपोआपच आदिवासींच्या खाद्यसंस्कृतीत रोजच खाद्य भात झालं आहे.पहिलं जे आदिवासींमद्ये मधुमेहाचे प्रमाण कमी होते ते आत्ता खूप जास्त प्रमाणात दिसू लागले आहे .काही रानभाज्या अश्या आहेत त्या विशिष्ट ऋतुमध्येच मिळतात,ते त्या ऋतुतच खायला पाहिजे.रानभाज्यांचा चा सुद्धा उल्लेख रेला गीतांमध्ये मिळतो.

रेला पाटा*: "भाजी किचवानी ,भाजी किचवानी ,संगो कठोडा भाजी किचवानी.रेला रे रे ला रेला, रेला रे रे रेला."*

इथे जस कोठडा भाजी चा उल्लेख तसेच काही रेला गीतांमध्ये भाजी तसेच ती शरीराला देणारी प्रतिक्रिया याच्याबद्दल सुध्दा गायले गेले आहे,जसे तरोटा भाजी हाथ पाय गुडघे दुखणे आणि सात्या/अळंब्या/टेकोडे दुसरी औषधी चालू असतांना न देणे,कारण दुसऱ्या औषध्यांच्या प्रतिक्रियेला घटवतो. अश्या कित्येक रोजच्या आहाराशी निगडित माहीतिचा साठा या रेला गीतांमध्ये बदलवून आपल्या पूर्वजांनी सुरक्षित ठेवलेला आहे.

## मातीपरिक्षण/वनशेती

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात खूप चांगल्या प्रकारचे शेतीच्या कामासाठी अवजारे तसेच खूप वेगवेगळ्या प्रकारचे तंत्रज्ञान जगामध्ये विकसित झालेले आहेत.आज जस जसा माणूस तंत्रज्ञानाचा उपयोग करू लागला स्वतःच्या अंताकडे जाऊ लागला आहे. रेला गीतांमध्ये

गोंडी रेला *: "वंजिंग गाटा हाता, तोडी तच्ची वाटा."*

मराठी अर्थ *:"*धान गाटा मेला, माती आणुनी टाका.*"*मराठी तर्कशील अर्थ*:* निदर्शनास असे आले की ,ज्या धान गाट्याची पीक पिकण्याची कास निघून गेली आले त्याला मेलेली जागा असे म्हटले आहे, माती आणुनी टाका म्हणजे ज्या जाग्यात कास आहे राबण्याची तिथली माती आणून तिथे टाका असे या ओळींमध्ये म्हटले आहे,आणि काही काळापूर्वी गोंड आदिवासी सेंद्रिय शेतीसाठी ह्या सूत्राचा वापर करत होते .वनशेती म्हणजे ? फक्तं मोठ्या वृक्षांची शेती करणे म्हणजे वनशेती नव्हे. गोंड आदिवासींच्या वनशेतीत वनस्पतीच्या छोट्याश्या मुळापासून तर मोठया खोडापर्यंत येतात.रेला गीतामध्ये,

रेला पाटा*:"वय झुंझुंर केडा रा भिमा ना,वय झुंझुंर केडा रा.*

*सरी भूले मोतोना ये भिमा,सरी भुले मातोना."*

मराठी अर्थ *:* घनदाट जंगल रा भिमाचा, घनदाट जंगल.

रस्ता भुललो भिमा, रस्ता भुललो.*"*

तर्कशिल अर्थ बघता असा निघतो की, हा जो घनदाट जंगल आहे तो जंगल भिमाचा(गोंड आदिवासींचा एक विद्वान पुर्वज) आहे या घनदाट जंगलामध्ये चकवा/भुलवन/भुरड कुणालाही पडू शकतो, तेंव्हा जंगलात वावरतांना सतर्कतेने वावरा असा इशारा या गीतातून सांगितला गेला आहे .

## पाण्यातील जलचर/ मासेमारी

गोंड आदिवासींमध्ये टोटेम व्यवस्था आहे. टोटेम व्यवस्थेमध्ये जलचर प्राण्यांचा काही प्रमाणात अभ्यास केला गेलेला आहे . आपण पाण्यातील कित्येक जलचारांचा अभ्यास वैज्ञानिक दृष्टिकोनातून केला गेलेला असेल ,परंतु रेला पाटा गीतांमध्ये खूप अशा जलचर प्राण्यांचा उल्लेख मिळतो. जसे की रेला गीतामध्ये ,

रेला गीत*: बोदेमीन,मांगुर मीन,मगुर, कासो हेमुल, पद्दी मीन*

मराठी अर्थ : बोदमासोळी , मांगुर मासोळी,मगर, कासव,डुक्कर मासोळी, शित मासोळी अश्या दुर्मिळ जलचर प्राण्यांचा उल्लेख ,तसेच त्या प्राण्यांच्या शरीरचना जीवनशैली चा उल्लेख सुद्धा थोड्या थोड्या प्रमाणात विखुरलेलं या रेला गीतांमध्ये आढळून येतो. काही विशिष्ट प्रकारच्या जलचर प्राणी एका विशिष्ट वेळेत दिसतात, आणि बाकी वेळेस विलुप्त होतात. वर्षभर न दिसणारा ढोलबडगा मासोळी पहिल्या दुसऱ्या पावसाला छोट्या छोट्या झऱ्यांमध्ये नाल्यामध्ये वगरांमध्ये दिसून येतात . हा सर्व निसर्गातील कोड त्या रेला गीतांमध्ये परावर्तित करून गोंड आदिवासींनी जणू काही वेगळाच सांस्कृतिक वारसा जपला आहे. असे कित्येकीत रेला पाटामधील उल्लेखित प्राण्यांचा अस्तित्व आज आढळत नाही,कारण ते प्राणी काळानुरूप दुर्मिळ होत गेले, काही तर नामशेष झाले.

## निसर्ग वाचन

निसर्ग वाचन हा मुख्यता रेला गीतांमध्ये सरळ साध्या सोप्या पद्धतीने दिसून येतो. गीतांमध्ये असलेला निसर्गातील रहस्यांचा साठा आपल्याला प्रामुख्याने दिसून येतो. जसे की रेला गीतामध्ये ,

रेला गीत *:"जमेतोकुर वेलके निवा नगुरे, वय झुंजुर केडा नीवा वतूने. बारा खुटाना उडान निवा रायबंडू, बारा खुटाना उडाने."*

मराठी अर्थ *:* "जमेतोकुर (ताडोब्याचा) प्रदेश तुझा मायदेश,घनदाट जंगल तुझा इलाका/प्रदेश .बारा हाताची तुझी उडान वाघोबा बारा हाताची तुझी उडान."

तर्कशिल अर्थ या ओळींचा असा निघतो की , ताडोब्याचा प्रदेश जरी आत्ता वाघांचा प्रदेश म्हणून प्रचलनात आला तरी तो अनादी काळापासून वाघांचा प्रदेश म्हणून आदिवासींमध्ये प्रचलित होता,याचा उल्लेख या ओळींमध्ये केला गेलेला आहे.हा प्रदेश त्याची मायभूमी आहे, तसेच त्याला पूरक असे वातावरण या प्रदेशात होते. "बारा हाताची त्याची उडान "हा आपल्या पूर्वजांचा निसर्ग वाचनाचा एक खूप मोठा उदाहरण आहे.आत्ताही तुम्ही काटेकोर अभ्यासातील वाघाची उडी आणि रेला पाटा मधील वाघाची उडी या दोघांची तुलना केल्या असत्या दोन्हीचा अंतर समांतर आढळून आले.

## रेला पाटा वरील संकटे

*1)* भाषा लुप्त होत चाललेली आहे.

*2)* युवापिढीला शाश्वत जीवन नको आहे .

*3)* दुसऱ्या भाषेचा वाढता प्रभाव.

*4)*तंत्रज्ञानाच्या युगात लोकगीतं कुठेतरी तरुणांना नको आहे .

*5)* माणसामाणसांतील वाढत चाललेला दूरावा.

*6)* युवापिढीला ती लोकगीतं एका तर्कशिल पद्धतीने आणि वैज्ञानिक पद्धतीने समजू शकत नाही आहे.

*7)* काळानुसार झालेला बोलीभाषेतील बदलामुळे रेला गीतांचा अर्थ समजणे थोड कठीण आहे .

जंगलातील कित्येक वनस्पतींचा उपयोग मानवाच्या जीवनात होत असतो. आदिवासी प्रामुख्याने जंगलातील झाडांचा उपयोग आपल्या आयुष्यात करून घेत असतो. जंगलामध्ये वेगवेगळ्या प्रकारची झाडे असतात ,काही झाडे लाकडासाठी उपयोगात तर काही झाडे फळांसाठी , औषधांसाठी उपयोगात आणत असतात. गोंड आदिवासींनी वापरात आणलेली प्रत्येक झाडाची माहिती ही आपल्या रेला गीतांमध्ये परावर्तित करून ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतात. कित्येक झाडांचा

उपयोग आदिवासी लोक आपल्या गीतांमधून येणाऱ्या पिढीला समजावून सांगत असतात. जन्मापासून तर मृत्यूपर्यंत कोणत्या लाकडाचा कशा पद्धतीने उपयोग करून घ्यायचा याचा सार त्या रेला गीतांमध्ये आत्ताही आढळतो. जसे,

1) रेला पाटा: *बत्ती मराता ता ईदे ढोले बती मराता? मरका मराता इदे ढोले ,मरका मरता.*

मराठी अर्थ: कोणत्या झाडाचा हा ढोल? आंब्याच्या झाडाचा हा ढोल, आंब्याच्या झाडाचा.

2) रेला पाटा : *बत्ती मराता ता निवा मर्मिन मंडा रो संगी ? बत्ती मरात निवा मर्मिना मंडा?*

*इरूक मरा ता नावा मर्मिना मंडा रो भाटो ईरुक मरा ता.*

मराठी अर्थ : कोणत्या झाडाचा लग्नाचा मुंडा तुझा संगी ?कोणत्या झाडाचा लग्नाचा मुंडा?

मोहाच्या झाडाचा माझा लग्नाचा मुंडा भाटो, मोहाच्या झाडाचा लग्नाचा मुंडा.

3) रेला पाटा: *बत्ती मरा ता भीमा ना डफडा रो दादा ? बती मराता भीमना डफडा?*

*हेरका मरात्ता भीमा ना डफडा रो दादा, हेरका मराता भीमा ना डफडा.*

मराठी अर्थ: कोणत्या झाडाचा भिमाचा डफडारो दादा ?कोणत्या झाडाचा भीमाचा डफडा?

चाराच्या झाडाचा भिमाचा डफडा रो दादा,चाराच्या झाडाचा भिमाचा डफडा.

4) रेला पाटा: *बत्ती कटेता निवोर कुही रो दादा ? बत्ती कटेता निवोर कूही ?*

*अंजन कटेता नावा कुही रो दादा , अंजन कटेता कुही .*

मराठी अर्थ: कोणत्या लाकडाची तुझी विहीर रो दादा? कोणत्या लाकडाची तुझी विहीर?

अंजनाच्या लाकडाची माझी विहीर रो दादा,अंजणाच्या लाकडाची माझी विहीर.

अशा कित्येक झाडांच्या लाकडांचा उपयोग त्या रेला गीतांमध्ये आढळून येतो. काही विशिष्ट झाडाची लाकडे विशिष्ट कामासाठी उपयोगात आणली जातात, ते सुद्धा त्या लेला गीतांमध्ये प्रामुख्याने गायली जातात. चार ,टेंभुर ,बेल, येरोन्या,कवठ ,चिंच, मोह ,बिब्बा, काळी हळद, काट बोरल्या बोरी, टेकोडे आणि किरण्या अशा कित्येक झाडांची फळांची तसेच त्यांच्या उपयोगाची माहिती या रेला गीतांच्या माध्यमातून येणारा पिढीपर्यंत ही गोंड आदिवासी पोहोचवत असतात.

जंगलामध्ये राहत असताना आदिवासी खूप काटेकोरपणे निसर्गाचा अभ्यास करत असतो. निसर्गातील रहस्यांचा अभ्यास करत असताना आदिवासी त्या रहस्यांना आपल्या गीतांमध्ये परावर्तित करतात आणि तो माहितीचा साठा गीतामध्ये सुरक्षित ठेवतात ,परंतु त्याच स्पष्टीकरण ते मात्र इतर कोणालाही न सांगता कधीकधी स्वतःच्या पिढीला सुद्धा सांगत नसतात. जसे बान विषबाधेची माहिती "उरूम कोला " या संगीत प्रकारात आहे. उरूम म्हणजे घोरपड, कदाचित घोरपड या प्राण्यापासूनच बान विषबाधेची माहिती आदिवासींना झाली असेल ,ते कसे तर घोरपड ही आपल्या शिकारीला चावून त्याच्या आत स्वतःची विष सोडतो त्या विषाने तो प्राणी थोड्याच वेळात बेशुद्ध मृत्युमुखी पडतो आणि घोरपड त्याचे शिकार करतो. अशा कित्येक

प्राण्याच्या जीवनातील छोट्या छोट्या गोष्टींचा वापर करून आदिवासी लोक स्वतः च्या आयुष्यात ते उपयोगात आणतात ,आणि हा माहितीचा साठा पूर्णतः नष्ट होऊ नये ह्या कारणासाठी रेला गीताच्या स्वरूपात संरक्षित करून पिढ्यानपिढ्या जपून ठेवतात. उरूम कोला या गीतात काही आदिवासी तिचा सोंग घेऊन त्या प्राण्याची हुबेहूब नक्कल करतात आणि बाकीचे संगतीला रेला गात असतात. मुख्यता चंद्रपूर मधील गोंडपिपरी आणि पोंभुर्णा या भागात जी मिश्र प्रकारची दंडार होत होती त्या दंडारीत आदिवासी लोक तसेच काही प्रमाणात इतरही लोक सामील असायचे परंतु, मुख्यत्वे त्याच्यात जंगलातील प्राणीमात्रांचा उल्लेख त्यांची नक्कल हे प्रामुख्याने दंडारीचे आकर्षण असायचे. हा निसर्ग अथांग आहे त्याला पूर्ण समजणे हे माणसाला शक्य नाही. परंतु जेवढा आदिवासी समुदाय त्यांनी निसर्गाला एकरूप होऊन आयुष्य जगतो तेवढा इतर कोणीही जगू शकला नाही, म्हणून आत्ताही खूप मोठा निसर्ग रहस्यांचा भंडार आदिवासींच्या रेला लोकगीतांमध्ये आढळतो. आज काळानुरूप आदिवासींचे मुख्य समाजासी होत असलेला होत असलेला मिळावा तसा आदिवासी समाज निसर्गापासून दुरावत आहे.

जंगलातील साळींदर याला गोंडी भाषेत सुई वेलाळ असे म्हटले आहे ,त्याच्या जीवनातशी निगडित कित्येक गोष्टी रेला पाटा भिडी मध्ये गायल्या जातात .तो प्राणी कसा राहतो ?कुठे राहतो? तो किती किल्ल्यांना जन्माला घालतो ? त्याचे अन्न काय आहे? ह्या सर्व बाबींची माहिती रेला गीतांमधून आढळते.

## आयुष्यासी निगडित

सर्वसामान्य आयुष्यात काय चालू आहे याचा उल्लेख सुद्धा प्रामुख्याने लेला गीतांमध्ये गायला जातो. दुःख, आनंद ,राग अशा कितीतरी रसांचा गीतांमध्ये उल्लेख केला जातो.

1) रेला पाटा: *लाडाले तुंगता येरे बगा चले मातोर ?*

*लाडाले तुंगता येरे चांदा चले मातोर ,चांदा तोर राजाना येनी पोहे मातोर*

मराठी अर्थ: नवरदेवांला आंघोळ करून दिलेला पाणी कुठे जात आहे?

नवरदेवाला आंघोळ घातलेला पाणी चांदा जात आहे ,आणि चांदाच्या राजाचा हत्ती वाहून जात आहे त्या पाण्याने.

या ओळींचा तर्कशील अर्थ असा निघतो की, ज्या दिवसापासून मुलाच्या घरी लग्नाची गोष्ट निघाली त्या दिवसापासून होणाऱ्या नवरदेव मुलाच्या विचारात हे चालू असते . की माझे लग्न झाले तर मी त्या मुलीशी असा बोलणार असा वागणार हे करणार ते करणार असं त्या मुलाचं मन त्या विचारांमध्ये मग्न असते,म्हणजेच तो हत्ती म्हणजे मुलाचा मन ,आणि तो पाणी म्हणजे त्याच्या डोक्यात चाललेले विचार त्याच्यात तो पोहत असतो, मुलाचे मन त्या विचारात होत असते मुलाचे मन त्या विचारात होत असतो.

इतके सविस्तर मार्मिक लोकगीते असू शकतात हे मला त्या गीताचा सार समजल्यानंतर कळाले. असे कित्येक आयुष्य जगण्याचा सार सांगणारे रेला गीत प्रामुख्याने गोंड आदिवासी समुदायात आढळून येतात. असे मार्मिक गीत सुद्धा मोठ्या उत्साहाने गायली जातात.

## निष्कर्ष

शाश्वत जीवनशैलीचे प्रामुख्याने सार गीतांमध्ये मुख्यतः आढळून येतो . काळाच्या ओघातात रेला गीत लोप पावत चालली आहेत. रीला गीतांमधील तो शाश्वत जीवन जगण्याचा साठा वेळेतच साठवून ठेवायला हवे, नाहीतर काळाच्या ओघातात तो भला मोठा माहितीचा खजिना लुप्त होऊन जाईल. येणारी पिढी त्याच्यापासून माहिती अभावी वंचित राहील. पुन्हा त्या भाषेचे

धडे त्या भाषेतील गुढ रहस्यांची गोडी येणाऱ्या पिढीला चाखता यावी यासाठी त्या भाषेला अनुसूची आठवी मध्ये दर्जा देण्यात यावा. वाढत्या तंत्रज्ञानामुळे आदिवासी तरुण पिढीमध्ये स्वतःच्या भाषेचा संस्कृतीचा त्याच्यातील गुढ

रहस्यांचा विसर पडत चालला आहे. स्थानिक पातळीवर गोंड आदिवासींच्या लहान मुलांना प्राथमिक शिक्षण हे त्यांच्या स्वतःच्या मायबोलीत म्हणजे गोंडी या भाषेत सरकारने देण्याचा प्रयत्न करावा. आज जगाला आदिवासी संस्कृतीची भुरळ पडत चालली आहे, हे बघता आदिवासी समाजातील युवा पिढी स्वतःच्या संस्कृतीला समजून घेऊन ती कशी वैज्ञानिक दृष्ट्या रचली आहे हे जागतिक पातळीवर सिद्ध करण्याची गरज आहे. आजच्या आधुनिक युगाची तरुण पिढिला भुरळ पडली आहे, परंतु त्यांना योग्य दिशा दाखवून संस्कृतीतील असलेला नैसर्गिक वारसा निसर्गासी असलेला एक नाता योग्य पद्धतीने सांगायला हवे.

तरुण पिढीला सुद्धा वृद्धांची जवळीक साधून रेला पाटातील मर्म शाश्वत जीवनशैलीचे रहस्य समजून घ्यायला हवे.

## संदर्भ

1. Singh, K., Chakma, T., Ray, S., Vaidh, N., & Shrivastava, S. (2024). Exploring the viability of newer technologies in care and management of tribal diabetes and metabolic syndrome in India. International Journal of Research in Medical Sciences, 12(4), 1321-1326, https://doi.org/10.18203/2320-6012.ijrms20240865.
2. Online Interview Exclusive Interview with Forest Sage Maruti Chitampalli (Part-2), https://www.youtube.com/watch?v=JmVPQs3JbE4.
3. https://1drv.ms/w/c/373130ec855b11ab/EXP9eLCI9CdBub5cZSXPPF0Bl4EXD555GDrYfjVZ01NDww?e=NWBxJN.